ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात केलेल्या
गैरवर्तनाबाबत शिक्षा अंतिम करणे.
(श्री जरे रामकिसन शंकर,तत्कालीन ग्रामपंचायत
अधिकारी, ग्रामपंचायत देवराई ता.पाथर्डी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३०७/२०२६
दिनांक- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ- १. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांचेकडील अहवाल पत्र जा.क्र.वशि/ ग्रापं/ ३५५१/२०२४ दिनांक २३/०७/२०२४.
२. या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र. ग्रापं-३/७०१२७६, दि.०९/१२/२०२४.
३. श्री. रामकिसन शंकर जरे, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत देवराई, ता. पाथर्डी यांचा खुलासा दि.३०/०६/२०२५.
४. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२२९६३०७, दि.१०/०४/२०२६.
५. श्री. रामकिसन शंकर जरे, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत देवराई, ता. पाथर्डी यांचा खुलासा दिनांक २२/०४/२०२६.

ज्याअर्थी संदर्भ क्र.१ च्या चौकशी अहवालातील निष्कर्षाचे,अभिप्राय व पुराव्याचे कागदपत्रांची पडताळणी करता श्री जरे यांच्या कार्यकाळात नमुना नंबर ८ मध्ये खाडाखोड केल्याचे दिसून येत आहे . बेकायदेशीरपणे नमुना नंबर ८ वर नोंदी घेणे त्या पुन्हा रद्द करणे, त्यामधे खाडाखोड करणे .तसेच ग्रामपंचायत मासिक सभा वेळेत व नियमानुसार बंद न करणे, वेळीच ठराव न लिहीणे, या प्रकारचे श्री जरे यांनी कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केला आहे. म्हणुन संदर्भ क्रमांक ०४ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ४ (२) नुसार त्यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होईल, अशा रितीने एक वर्षाकरीता का थोपविण्यात येऊ नये?, याबाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात येऊन खुलासा मागविण्यात आला होता.

त्याअर्थी संदर्भ क्रमांक ५ अन्वये श्री जरे रामकिसन शंकर,तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत देवराई ता.पाथर्डी यांचा या प्रकरणी खुलासा प्राप्त झाला असुन खुलासा अंशत: मान्य करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा शिस्तभंगविषयक प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री जरे रामकिसन शंकर, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत देवराई ता.पाथर्डी यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी केलेल्या गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ४(२) अन्वये पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही, अशारितीने एक वर्ष रोखून धरणे, ही शिक्षा अंतिम करीत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री जरे रामकिसन शंकर, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत देवराई ता.पाथर्डी यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०९२५०६०१७९ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 25-09-2026 14:48:52
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा

२/-सदर आदेश श्री जरे रामकिसन शंकर, ग्रामपंचायत अधिकारी यांना बजावण्यात येऊन सेवापुस्तकात नोंद घेतलेल्या पानाची छायांकित प्रत सादर करावी.

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाथर्डी